पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## ह.भ.प. स्व. बद्रीनारायणजी भंडारी

# विलक्षण व्यक्तिमत्व

संगमनेरचे सामाजिक जीवनामध्ये अनेक कार्यक्रम व उपक्रम नियमित सुरू असतात. एका अर्थाने सर्व समाजाची, सर्व पंथ-उपपंथांची गतिविधि सक्रियतेने जाणवत असते. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मुळात सक्रियता की ज्यांचे स्वभावात भिनली आहे अशा व्यक्तिरेखांचा सहभाग.

स्वर्गीय बद्रीशेठ भंडारी यांचे निधनाचे वृत्त कानी आल्याबरोबर संगमनेरच्या धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान नजरेसमोर तरळून गले. माहेश्वरी समाजाने निर्मित केलेले पण सर्व समाजासाठी उपलब्ध असलेले शहराचे मध्यभागी 'भंडारी मंगल कार्यालय' जे साकार झाले ते भंडारी परिवाराच्या दातृत्वातूनच.

मला आठवते अयोध्या राम मंदिरासाठी प्रत्येक गावातून एक वीट पूजा करून पाठवण्याचा महत्त्वकांक्षी कार्यक्रम विश्व हिंदू परिषद व राम जन्मभूमी आंदोलन समितीच्या संयुक्त विद्यमाने देशभरात सुरू होता. माझे वर त्यावेळी संपूर्ण नगर जिल्ह्याची जबाबदारी होती. स्वाभाविकपणे मला वाटले की जिल्ह्यातील सर्व कार्यक्रम उत्साहाने पार पडतीलच. वातावरण ही असे होते की संपूर्ण हिंदू समाज गावखेडी, शहरे कोणताही अपवाद न करता कामाला लागला होता. गरीब, श्रीमंत व्यापारी, कामगार, पुरुष-महिला, युवा, धार्मिक लोक, मंदिरे, देवस्थान समिती, वारकरी, हरिपाठ करणारे गावचे लोक, संत वृंदासह योजनेत सहभागी झाले होते. आपल्या संगमनेर शहरातील कार्यक्रम सर्वत्र चर्चेचा व मोठा व्हावा असे स्वप्न उराशी बाळगून आम्ही कार्यकर्ता समूहासह स्वर्गीय बद्रीशेठ भंडारी यांची भेट घेतली व सर्व आंदोलनाची योजना त्यांचे कानी घातली. आमचे सर्व म्हणणे ऐकून त्यांनी जी उभारी दिली, मदतीचा हात पुढे केला व आमच्या नियोजनाची अपेक्षेपेक्षा जास्त मोठा व भरगच्च कार्यक्रमाची रुपरेखा त्यांनी तयार केली. महिनाभरात संपूर्ण तालुका पिंजून काढला. सर्व गावांचे प्रतिनिधित्व करत सर्वांना समारोपाच्या कार्यक्रमासाठी संगमनेर शहरात शारदा शिक्षण संस्थेच्या प्रांगणात येण्याचे निमंत्रण दिले. कार्यक्रमाच्या दिवशी वेगवेगळ्या समाजातील जोडप्यांना बसवून सार्वजनिक होम कुंडाद्वारे आहुती दिली गेली. संपूर्ण शहर व्यापी मोठी शोभायात्रा राम रथाद्वारे संपन्न झाली. समारोपात राष्ट्रीय स्तरावरील विश्व हिंदू परिषदेच्या श्रीमती मंदाताई दाणी, नेवासाचे देवगड संस्थांनचे ह.भ.प. भास्करगिरी महाराज, पाथर्डीचे मुकुंद महाराज जाटदेवळेकर व सर्व गावातील वारकरी मंडळी यांचे उपस्थितीने संपूर्ण जिल्ह्यात भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित करणारे व यशस्वी करणारे स्वर्गीय बद्रीशेठ भंडारी हेच होते.

माहेश्वरी समाजाची दिंडी वारीच्या माध्यमातून पंढरपुरात गेली पाहिजे व महाराष्ट्राची सामाजिक जीवनातील इतक्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या धार्मिक आयोजनात माहेश्वरी समाजाचेही सक्रिय योगदान हवे, हे स्वप्न बद्रीनारायणजी भंडारी यांचे कल्पनेतून व प्रयत्नातूनच साकार झाले. १९७८ साली सुरू झालेली ही दिंडी आजतगायत निरंतरपणे व मोठ्या प्रमाणात चालू ठेवण्यात त्यांनी महत्वपुर्ण भुमिका बजावली.



बालाजी मंदिराचा सप्ताह सोहळा सुद्धा एका जाती पुरता मर्यादित राहू नये. विविध मोठ्या कीर्तनकार व प्रवचनकार यांना बोलावून त्याला सर्वसमावेशीरूप त्यांचेच प्रयत्नातून साकार झाल्याचे आपणास पहावयास मिळते.

वारीमध्ये कधी प्रकृती ठीक नसेल तर वाहनातून जाऊन का होईना पण त्यांनी आपल्या वारीमध्ये कधीही खंड पडू दिला नाही. अनेक लोकांना वारीची अनुभूती त्यांचे मुळेच झाली, असे अनेक जण मान्य करतात. कोणताही कामासाठी सढळ हाताने मदत करणे, आपले विचार केवळ परिवारा पुरते सीमित न ठेवता सर्वांना सामावून घेत सामुदायिकपणे निर्णय घेऊन कार्यरत राहणे, हा त्यांचा स्वभाव होता. आपल्या कुटुंबातील केदारनाथ (बाळुशेठ) व सुन शोभना यांनाही हा वारसा पुढे चालवत ठेवण्याची प्रेरणा त्यांनी दिली. काल परवा झालेली आषाढी वारीत सुद्धा प्रकृती ठीक नसताना सुद्धा वाहनाच्या माध्यमातून त्यांनी वारी पूर्ण केली हा त्यांचा संकल्प व श्रद्धेचा उच्चांकच म्हणावा लागेल.

सतत हसत कोणत्याही प्रश्नाला सामोरे जाणारे व्यक्तिमत्व, व्यवसायात सचोटीने प्रगती करणारे, मेहनती, धार्मिक कार्यात अग्रेसर, दानदाता रूपाने परिचित असे लोभसवाणे व खंबीर व्यक्तित्व आपल्यातून गेले आहे. त्यांची अनुपस्थिती केवळ भंडारी परिवारासच नाही तर संपूर्ण समाजाला ही नियमित जाणवत राहील. अशा कार्यकुशल व्यक्तित्वाला माझी विनम्र श्रद्धांजली....



**- श्याम जाजू**
**माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष**
**भारतीय जनता पार्टी**

ह.भ.प. स्व. बद्रीनारायणजी भंडारी श्रध्दांजली विशेषांक पान नं. ४ वर



।। श्री राम ।।

माहेश्वरी दिंडीचे संस्थापक अध्यक्ष (आद्य प्रवर्तक) व
रामनाथ व राजेंद्र यांचे काकाजी तसेच केदारनाथ भंडारी यांचे परमपुज्य वडिल
तसेच चि. कृष्णा व चि. पार्थ यांचे आजोबा

# वै. बद्रिनारायणजी मुरलीधरजी भंडारी

यांचा वैकुंठवास गुरुवार, ता. ०६/०८/२०२६ रोजी
रात्री ८.०० वा. देवाज्ञा झाली आहे. त्यांचा

# बारावा विधी (पागडी)

सोमवार, ता. १७/०८/२०२६ रोजी, सायं. ५.०० वा. होणार आहे.

## ।। प्रवचन ।।

सोमवार, दि. १७/०८/२०२६, सायं. ६ ते ७ वा.
वक्ता: ह.भ.प. सिताराम महाराज शिंदे, संगमनेर

महाप्रसाद सायं. ७.०० वा.

ठिकाण

## श्री. मु. र. भंडारी मंगल कार्यालय, संगमनेर

शोकाकुल

ओंकारनाथ, रामेश्वर, सतिष, श्रीनिवास, सम्राट रविंद्र,
धिरज एवं भंडारी परिवार, संगमनेर

।। ओम शांती ।।

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदी वर 30% डिस्काउंट
ऑफर फक्त 31 ऑगस्ट पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# देश सामर्थ्य बनवण्यासाठी राज्यघटना महत्वाची - मा. मंत्री बाळासाहेब थोरात





## अमृत उद्योग समूहात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

संगमनेर (प्रतिनिधी) - देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक थोर पुरुषांनी बलिदान दिले. त्यांना अभिवादन करताना हा देश अधिक समृद्ध करण्यासाठी तरुणांनी राज्यघटना व लोकशाही जपण्यासाठी कटिबद्ध राहिली पाहिजे. आपल्या राज्यघटनेने जगाला मानवतेचा संदेश दिला असून चांगल्या सहकारी व शिक्षण संस्था हे आपले वैशिष्ट्य असून स्वतंत्र अमृतवाहिनी विद्यापीठ मिळाले असल्याचे प्रतिपादन मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

अमृत उद्योग समूहात सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समवेत व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, बाबासाहेब ओहोळ, कॅन्सर तज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात, रामहरी कातोरे, अमृतवाहिनी संस्थेच्या विश्वस्त सौ.शरयूताई देशमुख, संचालक विजय राहणे, रामनाथ कुटे, डॉ. तुषार दिघे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्रा. विवेक धुमाळ, किरण कानवडे, कृष्णा दिघे यांच्यासह विविध पदाधिकारी सर्व विभागांचे प्राचार्य अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक राष्ट्रपुरुषांनी त्याग व बलिदान केले आहे. त्यांच्या प्रति आदर राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. विविध भाषा धर्म जात पंथ असूनही राज्यघटनेमुळे आपण सर्व एक आहोत. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेमुळे आपल्याला मिळाले आहे देश अधिक सामर्थ्यवान होण्यासाठी राज्यघटना जपणे अत्यंत गरजेचे आहे.

मात्र सध्या काही लोक धर्माच्या नावावर राजकारण करत असून जातीभेद निर्माण करत आहेत. गुन्हेगारी वाढली आहे. गुन्हेगाराला कोणताही धर्म नसून त्याला शिक्षा झालीच पाहिजे. असे सांगताना थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी वयाच्या १८ व्या वर्षी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली १८ महिने कारावास भोगला त्यांचा वारसा आपल्याला लाभला असून त्यांच्या तत्त्वानुसार संगमनेरच्या सहकारी व शैक्षणिक संस्था वाटचाल करत आहेत. यावर्षी स्वतंत्र अमृतवाहिनी विद्यापीठ मंजूर झाले असून ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. यापुढील काळातही सर्वांना गुणवत्तेने काम करून हा लौकिक वाढवावा लागणार आहे याचबरोबर राज्यघटना जपण्यासाठी व अधिक मजबूत करण्यासाठी तरुणांनी कटिबद्ध राहावे असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.जयश्री थोरात म्हणाल्या की, तरुण ही देशाची संपत्ती आहे. झेन झी ने क्रांती केली आहे. हा देश आपल्याला पुढे नेण्यासाठी सर्व समाजाला सोबत घेऊन साधूसंतांनी सांगितलेला मानवतेचा विचार जोपासावा लागणार आहे असे त्या म्हणाल्या. यावेळी सुरक्षा अधिकारी मोहनराव मस्के यांच्या नेतृत्वाखाली कारखाना कार्यस्थळावर तर नरेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिस्तबद्ध पद्धतीने परेड ने मानवंदना दिली. अमृत उद्योग समूहातील विविध पदाधिकारी अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले.

### सर्व संस्थांमध्ये ध्वजारोहण संपन्न

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना मुख्य कार्यस्थळावर व अमृतवाहिनी शिक्षण संस्थेत लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते तर ध्वजारोहण झाले. राजहंस दूध संघ येथे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांच्या हस्ते तर डेंटल कॉलेज येथे डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. अमृतवाहिनी बँकेमध्ये कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.यावेळी या सर्व संस्थांचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

### बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर अमृत उद्योग समूहातील विविध विद्यालय व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी अत्यंत दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.यामध्ये पंजाबी, भांगडा,गवळण,डोंबारी गीत,फ्युजन साँग,महाराष्ट्राची लोकधारा, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा यांच्यासह विविध कार्यक्रमांनी अंगावर शहरे आणले. सर्व गीतांमधून देशभक्तीचा जागर करण्यात आला. यावेळी पालक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार अमोल खताळ यांच्या उपस्थितीत धांदरफळ खुर्द येथे उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा





धांदरफळ खुर्द येथील बी. जे. खताळ जनता विद्यालयात आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटनही आमदार अमोल खताळ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. तसेच बायोझाईम वर्धापनदिनानिमित्त बायोस्टॅट इंडिया लिमिटेडच्या वतीने आयोजित 'बायोझाईम प्रगती स्कॉलरशिप'चे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले.

यावेळी आमदार अमोल खताळ यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करताना, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी मोठा त्याग केला असून हे स्वातंत्र्य अबाधित राखणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान, कृषी आणि संरक्षण अशा विविध क्षेत्रांत भारत वेगाने प्रगती करत असून या प्रगतीचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशाची एकता आणि अखंडता हीच भारताची सर्वात मोठी ताकद आहे. देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रातून राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे, असे आवाहनही आमदार खताळ यांनी केले.

कार्यक्रमास भास्कर खताळ पाटील, मुरलीआप्पा खताळ, वैशालीताई मुळे, सरपंच लताताई खताळ, ड. विजय खताळ पाटील, शंतनु मुळे, सतीश खताळ, रामनाथ देवगिरे, संदीप ठोंबरे, वाळुंज सर, कोकणे सर, सतीश कोकणे, अण्णासाहेब गोडसे, भाऊसाहेब गुंजाळ, रोहिदासजी खताळ, विस्तार अधिकारी वलवे मॅडम, तलाठी उगले मॅडम, वाकचौरे मॅडम यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य देशाच्या विकासासाठी पुढे नेऊया - नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे



संगमनेर (प्रतिनिधी)- संगमनेर नगरपालिका येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त नगराध्यक्षा डॉ. मैथिली सत्यजीत तांबे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त संगमनेर शहरातील सर्व नागरिकांना शुभेच्छा देताना डॉ. मैथिली तांबे म्हणाल्या की, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मोठा संघर्ष केला आणि आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाने जीवन जगत आहोत. त्यामुळे स्वातंत्र्य दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून, स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

आजच्या दिवशी आपण आपापसांतील मतभेद बाजूला ठेवून देशाच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानातून प्रेरणा घेत भारताच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केले. यावेळी उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख, मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्याबरोबरच सर्व नगरसेवक, कर्मचारी वृंद उपस्थित होते.







पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

पाहिजेत
डायलिसिस टेक्निशियन
प्रशिक्षित उमेदवार – २ पदे
कॅथलॅब टेक्निशियन
प्रशिक्षित उमेदवार – २ पदे
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
– संपर्क –
8888882225
9766855593

नेवासकर ऑटोमोबाईल्स
पाहिजेत
सर्व्हीस सुपरव्हायझर
२ जागा
संगमनेर
8793223344
8446300400

फ्लॅट विकणे आहे
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

साज दागिन्यांचा
JGK जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्स
मेनरोड, संगमनेर : ☎ ०२४२५ - २२३८६२, ✆ ७५८८२ ४९८४९

पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com



# 1200 विद्यार्थ्यांनी साकारला 'नशामुक्त भारत'चा संदेश!

## डी. के. मोरे जनता विद्यालयात अनोख्या पद्धतीने स्वातंत्र्यदिन साजरा



वडगावपान (प्रतिनिधी) - सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेच्या डी. के. मोरे जनता विद्यालय, वडगावपान येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन अनोख्या आणि जनजागृतीपर उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार देशभर राबविण्यात येत असलेल्या 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत २.०' या अभियानाच्या पार्श्वभूमीवर विद्यालयातील तब्बल १२०० विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे 'नशामुक्त भारत - स्वस्थ भारत, सुरक्षित भारत, समृद्ध भारत' ही आकर्षक मानवी रचना साकारली. या उपक्रमातून व्यसनमुक्त भारताचा प्रभावी संदेश देण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यालयाचे प्राचार्य पोपट दये यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्काऊट-गाईडच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने मानवी रचना साकारत 'नशामुक्त भारत'चा संदेश दिला. या अनोख्या उपक्रमाचे उपस्थित पालक, ग्रामस्थ आणि मान्यवरांनी कौतुक केले.

**व्यसनमुक्त तरुणाई ही विकसित भारताची ताकद**

व्यसन ही आजच्या समाजासमोरील गंभीर समस्या असून विविध अमली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्तीचे आरोग्य, कुटुंबाचे सुख आणि समाजाची प्रगती धोक्यात येते. विशेषतः तरुण पिढीने व्यसनांपासून दूर राहणे अत्यंत आवश्यक आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशातील युवा पिढी निरोगी, सक्षम आणि व्यसनमुक्त असणे गरजेचे आहे. हीच भावना विद्यार्थ्यांच्या मनात बालपणापासून रुजावी, या उद्देशाने विद्यालयाने हा उपक्रम राबविला. यावेळी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. नशामुक्त भारत घडविण्याची जबाबदारी केवळ सरकारची नसून आपल्या प्रत्येकाची आहे. आपण स्वतः व्यसनांपासून दूर राहूया आणि आपल्या मित्रांसह समाजातील इतर व्यक्तींनाही व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरणा देऊया, असे आवाहन प्राचार्य पोपट दये यांनी आपल्या प्राचार्य संदेशातून केले.

**शिक्षकांच्या मार्गदर्शनातून साकारली भव्य मानवी रचना**

या अभिनव संकल्पनेची आखणी प्राचार्य पोपट दये यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक बाळासाहेब कांडेकर आणि कलाशिक्षक सत्यानंद कसाब यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ही भव्य मानवी रचना साकारली. या उपक्रमासाठी विकास पवार, भारत सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. मानवी रचनेसोबतच विद्यार्थ्यांनी आकर्षक रांगोळीच्या माध्यमातूनही नशामुक्त भारताचा संदेश अधोरेखित केला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी अविष्कार थोरात तसेच विद्यार्थिनी जानवी थोरात, प्रेरणा गडगे, अंजली थोरात, ईश्वरी इघे, अंकिता गडगे, अनुष्का गडगे, ज्ञानेश्वरी थोरात आणि स्वरा काशीद यांनी रांगोळी साकारण्यासाठी सहकार्य केले. डॉ. संजय आचार्य यांनी या संपूर्ण उपक्रमासाठी रांगोळीचे योगदान दिले.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षिसे देऊन गौरव**

स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विविध बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. वडगावपान येथील सामाजिक कार्यकर्ते संजय विष्णू कुटे व विजय कुटे यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविले. मेजर सुतीन थोरात यांच्या स्मरणार्थ इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास २,००१ रुपये व ट्रॉफी, तर द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास १,००१ रुपये व ट्रॉफी देण्यात आली. श्री. ज्ञानेश्वर गोपाळा गलांडे सर यांच्या वतीने इयत्ता दहावीतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांसह इयत्ता बारावीच्या विज्ञान, वाणिज्य व कला शाखेतील प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. तसेच कै. रत्नाकर निवृत्ती थोरात यांच्या स्मरणार्थ श्री. बाळासाहेब निवृत्ती थोरात यांच्या वतीने १५ ऑगस्टच्या संपूर्ण कार्यक्रमासाठी १,००० रुपयांचे बक्षीस देण्यात आले. श्री. राजेंद्र बोरुडे सर यांच्या वतीने इयत्ता दहावीमध्ये गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास १,००१ रुपयांचे बक्षीस देण्यात आले.

**उपस्थितांनी केला उपक्रमाचे कौतुक**

कार्यक्रमास विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रताप आहेर, ज्युनिअर कॉलेजच्या इन्चार्ज प्रा. संध्या निकम, सर्व आजी-माजी पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी साकारलेली 'नशामुक्त भारत' ही मानवी रचना कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरली. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर पिंगळे यांनी केले, तर कार्यक्रमाचे छायाचित्रण विवेक काशीद यांनी केले. स्वातंत्र्यदिनाचा उत्सव देशभक्तीबरोबरच सामाजिक प्रबोधनाचा संदेश देत उत्साहात पार पडला.

# टोलनाक्याच्या मनमानी कारभाराविरोधात स्वातंत्र्यदिनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमरण उपोषण

## ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होईपर्यंत लढा सुरूच राहणार: शहराध्यक्ष प्रवीण कानवडे




संगमनेर (प्रतिनिधी) : नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील हिवरगाव पावसा टोल नाक्याच्या कथित मनमानी कारभाराविरोधात तसेच प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यदिनी, शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी हिवरगाव पावसा टोल नाका कार्यालयासमोर पुनश्च आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

टोल ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या संबंधित महामार्ग अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही आणि टोल वसुली बंद केली जात नाही, तोपर्यंत आमरण उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण कानवडे यांनी दिला आहे.

यापूर्वी २० जुलै रोजी करण्यात आलेल्या उपोषण आंदोलनादरम्यान राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अधिकाऱ्यांनी आंदोलकांना विविध मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर २० दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही महामार्गावरील सुरक्षेच्या उपाययोजना तसेच सर्व्हिस रस्त्यांची कामे प्रत्यक्षात सुरू झालेली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यामुळे छक्कअख अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने केवळ कागदावरच राहिल्याचा आरोप करत नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणण्यात आला आहे. आंदोलकांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सिन्नर ते खेड महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत हिवरगाव पावसा टोल नाका पूर्णपणे बंद करण्याची मागणी केली आहे. तसेच सिन्नर-खेड महामार्गावरील अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या तसेच अपंगत्व आलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना ठेकेदार कंपनीकडून योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, ठेकेदार शंकर रामचंद्र लि. कंपनी आणि संबंधित अधिकाऱ्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, संबंधित अधिकाऱ्यांच्या महामार्ग सेवेत नियुक्ती झाल्यापासून त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी, तसेच ठेकेदार कंपनी आणि महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने केल्याचा आरोप असलेल्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. खोटी लेखी आश्वासने देऊन नागरिकांची फसवणूक केल्याचा आरोप करत संबंधित छक्कअख अधिकाऱ्यांवर तातडीने शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणीही आंदोलकांनी केली आहे. महामार्गावरील खड्डे, अपूर्ण कामे आणि सर्व्हिस रस्त्यांचा अभाव यामुळे वारंवार अपघात होत असून निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. 'नागरिकांचा जीव वाचवा आणि जबाबदारांवर कठोर कारवाई करा', या मागणीसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या उपोषणात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गजानन भोसले, जिल्हा उपाध्यक्ष अशोक काळे, महिला शहराध्यक्ष सरलाताई भुजबळ, रईस पठाण, अमोल म्हस्के, संतोष भुजबळ, ज्ञानेश्वर माळी, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. स्वातंत्र्यदिनीच सुरू करण्यात आलेल्या या आमरण उपोषणामुळे प्रशासन आणि टोल प्रशासनासमोर आव्हान उभे राहिले आहे. आंदोलनाला स्थानिक नागरिक तसेच वाहनधारकांकडून पाठिंबा मिळत असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. त्यामुळे आता संबंधित विभाग या मागण्यांची दखल घेऊन ठोस कारवाई करणार की पुन्हा आश्वासनांवरच समाधान मानणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेज़र | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# वै. बद्रीनारायणजी मुरलीधरजी भंडारी यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

## विठ्ठलभक्ती, वारकरी सेवा आणि सामाजिक समर्पणाचा दीपस्तंभ







काही व्यक्ती आपल्या आयुष्याचा प्रवास केवळ स्वतःच्या संसारापुरता मर्यादित ठेवत नाहीत; तर आपल्या कर्तृत्वाने, सेवाभावाने, श्रद्धेने आणि माणुसकीने असंख्यांच्या जीवनाला दिशा देतात. अशा व्यक्तिमत्त्वांचे देहावसान होते, तेव्हा केवळ एका कुटुंबाचा आधार हरवत नाही, तर समाजातील एक संस्कारवृक्ष, श्रद्धेचा दीपस्तंभ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड जाते. वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ शिरोमणी, पांडुरंगाचे निस्सीम भक्त, माहेश्वरी समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि संगमनेरच्या व्यापारी व सामाजिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिमत्त्व वै. बद्रीनारायण मुरलीधर भंडारी (वय ८८) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने भंडारी परिवारासह संगमनेर शहर आणि परिसरातील धार्मिक, सामाजिक व वारकरी क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

सिन्नर तालुक्यातील मानोरी या छोट्याशा गावाशी भंडारी कुटुंबाची नाळ जोडलेली होती. १९६० च्या दशकात हे कुटुंब संगमनेरमध्ये आले. कष्ट, प्रामाणिकपणा आणि ध्येयवेड्या वृत्तीच्या जोरावर वै. मुरलीधर भंडारी यांनी ऑइल मिल आणि डाळ मिलचा व्यवसाय सुरू केला. वडिलांच्या व्यवसायाला पुढे नेण्याची जबाबदारी बद्रीनारायण भंडारी यांनी समर्थपणे स्वीकारली. विविध भागांतून शेंगदाणे व सरकी आणणे, उत्तम प्रतीचे तेल तयार करणे आणि त्याला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी स्वतः परिसरात फिरून मार्केटिंग करणे, या अथक परिश्रमातून त्यांनी व्यवसायाचा विस्तार केला. त्यामुळे संगमनेर परिसरातील व्यापारी क्षेत्रात त्यांचे नाव आदराने घेतले जाऊ लागले.

भाऊ मोहनलाल व बहिण कमलाबाई चांडक यांच्यासह कुटूंब संभाळतांना, व्यवसाय करताना संसाराची जबाबदारीही त्यांनी तितक्याच प्रेमाने सांभाळली. पुष्पाबाई यांच्यासोबत त्यांचा संसार फुलला. मुलगा केदारनाथ आणि मुली आरती, भारती व कीर्ती असा त्यांचा परिवार. कुटुंबाला संस्कार, परिश्रम, प्रामाणिकपणा आणि अध्यात्माची शिकवण देत त्यांनी सुखी-समाधानी संसार उभा केला.

मात्र, त्यांच्या जीवनाचा खरा प्रवास केवळ उद्योग-व्यवसायापुरता नव्हता. व्यवसाय हे उपजीविकेचे साधन आहे; परंतु भगवंताचे स्मरण, नामस्मरण आणि समाजसेवा हे जीवनाला खरे समाधान देणारे साधन आहे, या विचाराने ते पुढे वाटचाल करू लागले. पांडुरंगाच्या भक्तीत त्यांचे मन रमले आणि वारकरी संप्रदायाशी त्यांचे नाते अधिकाधिक दृढ होत गेले. अनेक संत-महात्म्यांचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्या सहवासातून मिळालेली आध्यात्मिक ऊर्जा त्यांनी स्वतःपुरती न ठेवता ती वारकरी आणि समाजसेवेच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवली.



१९७७ मध्ये आळंदी, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर आणि पैठण येथील माहेश्वरी धर्मशाळांचे ट्रस्टी म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर वारकरी सेवा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली. १९७८ पासून त्यांनी आळंदी-पंढरपूर आषाढी वारीची सेवा सुरू केली. आज तब्बल ४९ वर्षांनंतरही ही विठ्ठल दिंडीची सेवा अखंड सुरू राहिली आहे. तसेच सुमारे ३९ वर्षांपासून मानोरी-संगमनेर-आळंदी कार्तिकी वारी देखील त्यांच्या पुढाकाराने आणि सेवाभावाने सुरू आहे.

दिंडी म्हणजे केवळ पायी चालत जाणारा भक्तांचा समूह नव्हे, तर ती भक्ती, शिस्त, समता, सेवा आणि अध्यात्माची चालती-बोलती शाळा आहे, हे भंडारी यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. प्रत्येक दिंडीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असे. आर्थिक योगदान, वारकऱ्यांची व्यवस्था, नियोजन आणि प्रत्यक्ष सेवाकार्य यात ते सदैव पुढे असत. स्वतः पांडुरंगाची सेवा करण्याबरोबरच इतरांनाही पांडुरंगाची सेवा करण्याची संधी मिळावी, हा त्यांच्या कार्यामागचा उदात्त हेतू होता.

ज्ञानेश्वर माऊली यांच्या सप्तशताब्दी निमित्त १९९४ मध्ये आळंदी येथे ज्ञानेश्वरीतील ९,०३३ ओव्यांनुसार ९,०३३ पांडुरंग भक्तांना पारायणासाठी बसविण्याचा भव्य संकल्प त्यांनी साकारला. हा सोहळा धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील ऐतिहासिक उपक्रम ठरला. देशभरातून संत-महात्मे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर या सोहळ्यास उपस्थित राहिले. ज्येष्ठ नेते शरद पवार, स्व. गोपीनाथ मुंडे, पद्मश्री अण्णा हजारे, विश्वनाथ कराड, रामायणाचार्य ढोक महाराज यांच्यासह अनेक संत-महात्म्यांनी या सोहळ्याला भेट देऊन पारायणात सहभाग नोंदविला.

भंडारी यांची भक्ती ही केवळ मंदिरातील पूजा-अर्चेपुरती मर्यादित नव्हती. वारकरी म्हणजे देवाच्या दारी जाणारा नव्हे, तर देवत्वाचा संदेश समाजापर्यंत नेणारा माणूस, या भावनेने ते कार्य करीत राहिले. बालाजी मंदिरात अनेक वर्षे त्यांनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले. वैकुंठवासी ह.भ.प. धुंढा महाराज, जगन्नाथ पवार, सदानंद महाराज, रामचंद्र महाराज नागपूरकर, वै. शंकर महाराज खंदारकर यांच्यासह अनेक संत-महात्म्यांचा त्यांना सहवास लाभला.


धार्मिक क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे होते. माहेश्वरी पंच ट्रस्टच्या माध्यमातून १९७२ मध्ये संगमनेर शहराच्या मध्यवर्ती भागात उभारण्यात आलेल्या भंडारी मंगल कार्यालयासाठी त्यांनी त्या काळात भरीव देणगी दिली. समाजाच्या सामूहिक गरजा लक्षात घेऊन योगदान देण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवते.

संगमनेर व्यापारी असोसिएशनचे त्यांनी तीन वर्षे अध्यक्षपद भूषविले. संगमनेरमधील उद्योजक व व्यापाऱ्यांसाठी महत्त्वाची असलेल्या संगमनेर मर्चंट बँकेचे ते संचालकही होते. त्यामुळे धार्मिक व सामाजिक कार्याबरोबरच शहराच्या व्यापारी क्षेत्रातील अनेक प्रश्नांशी त्यांचा जवळचा संबंध होता.

देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाच्या घडामोडींमध्येही त्यांनी सहभाग घेतला. अयोध्या कारसेवक अध्यक्ष म्हणून त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आणि त्या काळात त्यांना झाशीत अटकही झाली होती. श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहायला मिळत होता.

संगमनेर आणि परिसरातून पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविक-वारकऱ्यांसाठी पंढरपूर येथे स्वतःची धर्मशाळा असावी, ही त्यांची मनापासूनची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी चैतन्य अध्यात्मिक ट्रस्टची स्थापना करून १७ गुंठे जागा घेतली. या जागेवर आध्यात्मिक भवन उभारण्याचा त्यांचा संकल्प होता. त्यांच्या मनातील हा संकल्प त्यांच्या दूरदृष्टीचा आणि वारकरी समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाचा प्रत्यय देणारा आहे.

'विठ्ठलभक्ती म्हणजे स्वतःच्या आत्म्याचे समाधान आणि वारकरी सेवा म्हणजे त्या भक्तीचे समाजरूप', या भावनेतून त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हते; धर्म म्हणजे सेवा, सदाचार, परोपकार, नामस्मरण आणि माणसामाणसातील प्रेम. म्हणूनच त्यांच्या निधनाने अनेक वारकरी, भाविक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना आपला जिव्हाळ्याचा मार्गदर्शक हरपल्याची भावना होत आहे.



### ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

आज त्यांचा मुलगा केदारनाथ भंडारी उद्योगात वडिलांचा वारसा पुढे नेत परिवाराचे नाव उज्ज्वल करीत आहे. मुली आरती, भारती आणि कीर्ती, बहिण कमलाबाई चांडक या आपापल्या संसारात सुखी-समाधानी आहेत. व्यवसायाचा वारसा पुढे नेत असतानाच संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा जपणे, हीच वै. बद्रीनारायण भंडारी यांना खरी आदरांजली ठरेल.


८८ वर्षांचे आयुष्य म्हणजे एका व्यक्तीचा केवळ जीवनप्रवास नव्हे, तर एका पिढीचा सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहास असतो. वै. बद्रीनारायण भंडारी यांनी हा इतिहास आपल्या कर्तृत्वाने समृद्ध केला. उद्योगातून कष्टाचे महत्त्व, संसारातून संस्कारांचे महत्त्व, वारकरी सेवेतून भक्तीचे महत्त्व आणि सामाजिक कार्यातून माणुसकीचे महत्त्व त्यांनी पुढील पिढीसमोर ठेवले.

पांडुरंगाच्या चरणी अखंड श्रद्धा ठेवून आयुष्यभर सेवा करणाऱ्या या निस्सीम विठ्ठलभक्ताचा देहप्रवास थांबला असला, तरी त्यांनी पेटविलेला नामभक्तीचा, वारकरी सेवेचा आणि सामाजिक समर्पणाचा दीप पुढील अनेक पिढ्यांना प्रकाश देत राहील. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, आप्तेष्ट, वारकरी, भाविक, व्यापारी आणि असंख्य स्नेहीजनांच्या स्मृतीत त्यांचे स्थान सदैव अढळ राहील. त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली!

**पांडुरंगाच्या नामात ज्यांचे जीवन रमले,**
**वारकऱ्यांच्या सेवेत ज्यांचे आयुष्य गेले;**
**देह गेला तरी सेवा आणि संस्कार राहिले,**
**भंडारींचे कार्य चिरंतन स्मरणात राहिले.**

**– विशेष संपादकीय**
**संजय नामदेव आहिरे (मनोरी)**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**

# माहेश्वरी दिंडीचे आधारस्तंभ वैकुंठवासी ह.भ.प. बद्रीनारायणजी मुरलीधर भंडारी





राम कृष्ण हरी

माहेश्वरी समाजाच्या धार्मिक आणि वारकरी परंपरेत वैकुंठवासी ह.भ.प. बद्रीनारायणजी मुरलीधर भंडारी यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. माहेश्वरी समाजाला माऊलीच्या सोहळ्यात स्वतंत्र दिंडी मिळावी, यासाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न, त्यांचा वारकरी संप्रदायाप्रती असलेला निस्सीम भाव आणि दिंडीच्या माध्यमातून समाजाला दिलेली धार्मिक एकजूट ही त्यांच्या जीवनकार्याची अमूल्य देणगी आहे.

सन १९७७ मध्ये भाऊंनी माहेश्वरी समाजाची स्वतंत्र दिंडी माऊलीच्या सोहळ्यात असावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आणि माहेश्वरी समाजाला स्वतंत्र दिंडीची संधी मिळाली. पुढे हीच दिंडी महाराष्ट्रभर माऊलीची दिंडी क्रमांक ४५, रथामागे माहेश्वरी दिंडी म्हणून प्रसिद्ध झाली.

दिंडीची स्थापना झाल्यानंतर सन १९७८ पासून २०२६ पर्यंत तब्बल ४९ वर्षे भाऊंनी वारीची अखंड परंपरा जपली. तब्येत साथ देत असेपर्यंत त्यांनी पायी वारी केली आणि प्रकृतीने साथ देणे कमी झाल्यानंतर वाहनाने का होईना, पण वारीची परंपरा खंडित होऊ दिली नाही. विशेष म्हणजे, नुकतीच झालेली सन २०२६ ची आषाढी वारीदेखील त्यांनी पूर्ण केली. त्यांच्या मनातील माऊलीप्रतीची श्रद्धा आणि वारीप्रतीची निष्ठा यापेक्षा मोठे उदाहरण दुसरे कोणते असू शकते?

आषाढी वारी पूर्ण करून भाऊ संगमनेरला आपल्या घरी परतले. त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांच्यावर आठ दिवस रुग्णालयात उपचार सुरू होते. ह.भ.प. केदार माऊली, सौ. शोभना माऊली तसेच संपूर्ण भंडारी परिवाराने त्यांची अत्यंत प्रेमाने आणि जिव्हाळ्याने काळजी घेतली. मात्र नियतीच्या मनात काही वेगळेच होते. उपचार सुरू असतानाच भाऊंनी या इहलोकाचा निरोप घेतला आणि त्यांच्या जाण्याने माहेश्वरी समाजासह वारकरी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.

भाऊंचा स्वभाव रोखठोक, स्पष्ट आणि शिस्तप्रिय होता. नियमांचे काटेकोर पालन करणे, दिंडीमध्ये शिस्त राखणे आणि वारकरी परंपरेचा सन्मान जपणे, यासाठी ते सदैव आग्रही असत. त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांनी असंख्य वारकऱ्यांच्या मनात आदराचे आणि आपुलकीचे स्थान निर्माण केले.

माहेश्वरी समाजाला एक उत्तम धार्मिक व्यासपीठ मिळावे, समाजातील बांधवांनी एकत्र येऊन भक्तीचा आणि वारकरी परंपरेचा आनंद घ्यावा, यासाठी भाऊंनी आयुष्यभर मेहनत घेतली. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज माहेश्वरी समाजातील असंख्य भाविक माऊलीच्या दिंडीत अभिमानाने आणि श्रद्धेने सहभागी होतात. आज आपण ज्या दिंडीत गर्वाने चालतो, तिच्या पायाभरणीमागे भाऊंचे अथक परिश्रम आणि दूरदृष्टी आहे.

सन २०२७ हे माहेश्वरी दिंडीचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. माहेश्वरी दिंडीला ५० वर्षे पूर्ण होत असताना या ऐतिहासिक सोहळ्याचा आनंद नक्कीच मोठा असेल; परंतु त्याचवेळी एक मोठी खंत मनात कायम राहील-माहेश्वरी दिंडीचे सुवर्णमहोत्सवी वर्ष पाहण्यासाठी तिचे आधारस्तंभ असलेले भाऊ आता आपल्यात नाहीत.

मात्र व्यक्ती शरीराने दूर गेली तरी तिचे कार्य, विचार आणि संस्कार कधीच संपत नाहीत. भाऊंनी माहेश्वरी दिंडीसाठी केलेले कार्य पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्यांच्या कष्टांची, त्यागाची आणि माऊलीवरील अखंड श्रद्धेची आठवण प्रत्येक वारीत, प्रत्येक दिंडीत आणि प्रत्येक वारकऱ्याच्या मनात जिवंत राहील.

माऊलीच्या चरणी एवढीच प्रार्थना-

हे विठ्ठला, भाऊंनी आयुष्यभर तुझ्या नामाचा आणि वारीचा ध्यास घेतला. माहेश्वरी दिंडीच्या माध्यमातून समाजाला भक्तीचा मार्ग दाखविला. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना तुझ्या श्रीचरणी कायमचे स्थान दे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांचे कार्य पुढील पिढ्यांना सदैव प्रेरणा देवो.

राम कृष्ण हरी!

**– सचिनकुमार**
**शिवनारायणजी मालपाणी**
**गंगापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर**









